विनियम क्र. २३/२०२५

विद्यापीठ स्तरीय ''स्वच्छ भारत अभियान'' अंतर्गत उत्कृष्ट महाविद्यालयाला एक विद्यापीठ स्तरीय पुरस्कार व जिल्हानिहाय ०२ महाविद्यालयांना पुरस्कार देण्याबाबत – विनियम, २०२५.

ज्याअर्थी, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दि. २५/११/२०१४ रोजी Maharashtra Universities New Initiative for Joint Action Now (MUNIJAN) for Swachh Bharat Abhiyan सुरु करण्यास्तव प्रस्ताव पत्राद्वारे कळविला आहे.

आणि

ज्याअर्थी, स्वच्छ भारत अभियान निरिक्षण समिती दि. २५/०३/२०१५ अन्वये पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठस्तरीय ''स्वच्छ भारत अभियान'' निरीक्षण समितीने दिनांक २५/०३/२०१५ च्या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

i) ''स्वच्छ भारत अभियान'' उत्कृष्टपणे राबविणाऱ्या महाविद्यालयांना पुरस्काराने पुरस्कृत करण्यात यावे. निवड समिती मार्फत पुरस्काराकरीता निवड झालेल्या महाविद्यालयांमधून एका महाविद्यालयाला एक विद्यापीठस्तरीय पुरस्कार देऊन पुरस्कृत करण्यात यावे व इतर जिल्हानिहाय दोन महाविद्यालयांना पुरस्कार देण्यात यावे. निवड झालेल्या महाविद्यालयांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात यावे.

ii) सर्व संलग्नित महाविद्यालयांना सत्र २०१५-२०१६ पासून स्वच्छ भारत अभियान हा विषय (Theme) देण्यात यावा.

iii) महाविद्यालयाकडून प्राप्त पुरस्कार प्रस्तावामधून उत्कृष्ठ महाविद्यालयाची निवड करण्याकरीता मा. कुलगुरुंच्या निर्देशान्वये निवड समिती गठित करावी व सत्र २०१४-२०१५ मध्ये प्राप्त प्रस्तावामधून उकृष्ट महाविद्यालयाची निवड करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेत विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करावे.

iv) पुरस्कार वितरण समारंभाकरीता विद्यापीठ साधारण निधी अंतर्गत रासेयो प्रशासकीय खर्च या उपशिर्षामधील तरतूदी अंतर्गत स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, गुच्छे व इतर अनुषंगीक खर्च करण्यात यावा.

v) स्मृती चिन्हाचे व प्रमाणपत्राचे स्वरूप तसेच याबाबत इतर अनुषंगीक बाबीची निश्चिती मा. कुलगुरु द्वारा पुरस्काराकरीता गठीत समितीद्वारे करण्यात यावी.

आणि

ज्याअर्थी, २०१५ पासून उपरोक्त पुरस्कार प्रदान करण्यात येतात,

आणि

त्याअर्थी, व्यवस्थापन परिषद ७५(f) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार विनियम निर्गमीत करीत आहे.

१) हे विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्याचे दिनांकापासून अमलात येतील.

२) सदर विनियम ''विद्यापीठ स्तरीय स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उत्कृष्ट महाविद्यालयाला एक विद्यापीठस्तरीय पुरस्कार व जिल्हानिहाय ०२ महाविद्यालयांना पुरस्कार देण्याबाबत विनियम - २०२५'' असे संबोधन्यात येईल.

३) ''महाविद्यालय'' म्हणजे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय.

४) ''समिती'' म्हणजे कुलगुरुंनी महाविद्यालयाची निवड करण्यासाठी व तशी शिफारस करण्यासाठी नियुक्त केलेली समिती.

नियमावली : सदर पुरस्कार वितरणाची नियमावली खालील प्रमाणे

१) पुरस्काराकरीता अटी :-

अ) संलग्नित महाविद्यालयाने कमीत कमी मागील तीन वर्ष स्वच्छ भारत अभियान राबविने बंधनकारक राहील.

ब) अभियान राबवितांना संस्था पातळीवर वापरण्यात आलेले निकष अभियानाचे उद्दीष्ट पुर्ती करणारे असावेत.

क) राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत सातत्य असणे आवश्यक राहील.

ड) महाविद्यालय हे संलग्नित असणे बंधनकारक राहील.

इ) महाविद्यालयाचे स्वच्छतेचे अंकेक्षण अहवाल असणे बंधनकारक राहील.

२) पुरस्काराचे स्वरुप :-

अ.क्र.	संलग्नित महाविद्यालय	स्वरुप	पुरस्कार संख्या
१	विद्यापीठ स्तरीय पुरस्कार - गट १	स्मृती चिन्ह प्रमाणपत्र	०१
२	जिल्हा स्तरीय पुरस्कार जिल्हा निहाय दोन महाविद्यालये - गट २	स्मृती चिन्ह प्रमाणपत्र	०२

३) पुरस्काराची पात्रता

१) सदर पुरस्कारासाठी संलग्नित महाविद्यालये अर्ज करु शकतील.

२) सदर पुरस्कारासाठी १ मधील अटींची पुर्तता करणाऱ्या महाविद्यालयांचाच विचार करण्यात येईल.

३) हा पुरस्कार मिळाल्यानंतर महाविद्यालये हे त्या गटातील पुरस्काराकरीता १० वर्षा नंतर पात्र होतील.

४) सदर पुरस्काराकरीता स्वच्छता अंकेक्षण हे मागील तीन वर्षाचे असणे बंधनकारक राहील.

४) निवड समिती :- निवड समिती खालील प्रमाणे राहील

अ) मा. कुलगुरु - अध्यक्ष

ब) कुलसचिव - सदस्य

ब) दोन सहयोगी प्राध्यापक (मा. कुलगुरु नामीत सदस्य) - सदस्य

१) महाविद्यालयीन (एक)

२) विद्यापीठ (एक)

क) संलग्नीत महाविद्यालयातुन एक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी (रासेयो संचालक नामित) - सदस्य

ड) संचालक, विद्यार्थी विकास - सदस्य

इ) संचालक, रा.से.यो. - सदस्य सचिव

मा. कुलगुरु नामीत सदस्य ह्यांचा कालावधी १ वर्षाचा असेल. संलग्नित महाविद्यालय यातुन एक रासेयो कार्यक्रम अधिकारी सदस्याचा कालावधी हा १ वर्षाचा असेल व ते चक्राकार पध्दतीने नामीत होतील. (जिल्हयाचा क्रम :- अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम असा राहील)

५) अर्ज करण्याची पध्दती :-

- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पुरस्कारासाठी विहीत नमुन्यात अर्ज परिशिष्ठ 'अ' प्रमाणे सादर करावा.
- पुरस्कारा साठीचा अर्ज महाविद्यालयाने प्राचार्य, संचालक किंवा सक्षम अधीकारी ह्यांचे स्वाक्षरीने सादर करावा.
- अर्जासोबत कागदपत्रे जोडने बंधणकारक आहे.
- अर्ज समन्वयक रा.से.यो. ह्यांचेकडे सुचना निर्गमीत केल्याप्रमाणे वेळेत सादर करणे बंधनकारक राहील.
- वेळाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

६) निवड प्रक्रीया :-

अ) निवड समीतीने छाननी प्रक्रीया ही विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या सभा सुचने नुसार करण्यात येईल.

ब) निवड समीतीने परिशिष्ठ-ब मधील गुणांकण

क) तक्ता नुसार गुणांकण करुन निवड करावी.

ड) समीतीचा निर्णय अंतीम राहील.

७) **पुरस्काराचा खर्च :-** खर्च अस्तीत्वात असलेल्या साधारण निधी ह्या व्यय्य शिर्षामधुन एन.एस.एस. उपव्यय शिर्षा मधुन भागविण्यात येईल.

८) **पुरस्कार वितरण :-** पुरस्कार वितरणाची कार्यवाही संचालक रा.से.यो. करतील.

परिशिष्ट 'अ'

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना

स्वच्छ भारत अभियान उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार गट-नामांकनासाठी आवेदन पत्र

(संगणीकृत अर्ज सहा प्रतीत सादर करावा)

१) अर्जदाराचे नाव :- ----------

२) महाविद्यालयाचे नाव व पत्ता :- ----------

भ्रमणध्वनी क्र. :- .....

फॅक्स क्र. :- .....

मेल :- .....

३) स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महाविद्यालयाने केलेल्या कामाचा तपशील (५०० शब्दात)

४) महाविद्यालयाने सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

अ) स्वच्छता कार्यक्रमाचा मागील तीन वर्षाचा फोटोसह अहवाल. होय/नाही

ब) मागील तिन वर्षाचा स्वच्छता अंकेक्षण अहवाल. होय/नाही

क) महाविद्यालय संलग्निकरण प्रमाणपत्र. होय/नाही

ड) ह्यापुर्वी पुरस्कार मिळाल्याचे वर्ष व गट ..... होय/नाही

होय असल्यास पृष्ट क्र. नमुद करावेत

५) इतर आवश्यक माहीती :- ----------

स्थळ :-

दिनांक :-

स्वाक्षरी

नाव व हुद्दा
(शिक्का)

सुचना :- अर्ज, संचालक रासेयो, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ह्यांना टपालीने/हस्तलखोट्याने अथवा विषेश दुतामार्फत सादर करावेत.

केवळ कार्यालयीन उपयोगाकरीता

प्रस्ताव अग्रेषित करणाऱ्या निवड समीतीचा शेरा / शिफारस

सदस्य **सदस्य** **सदस्य** **सदस्य**

अध्यक्ष **सदस्य / सचिव**